दै. गोदातीर दि. 04/01/2025

# राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत नांदेड पोलीस दलाचे यश



**नांदेड (प्रतिनिधी)–** सिंधुदुर्ग जिल्हा जलतरण संघटना व महाराष्ट्र राज्य एक्वेटिक असोसिएशन यांच्या वतीने मालवण येथे चौदाव्या राज्यस्तरीय सागरी जलतरण स्पर्धा नुकत्याच संपन्न झाल्या. या स्पर्धेत नांदेड जिल्हा पोलीस दलातील पोलीस अंमलदार रामेश्वर जाधव आणि जयप्रकाश क्षिरसागर यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.

दि. २१ व २२ डिसेंबर २०२४ रोजी मालवण (जि. सिंधुदुर्ग) येथे चौदाव्या राज्यस्तरीय सागरी जलतरण स्पर्धा झाल्या. राज्यासह राज्याबाहेरील जवळपास चौदाशे स्पर्धकांनी यात सहभाग नोंदवला होता. नांदेड पोलीस दलातील रामेश्वर जाधव यांनी तीन किलोमीटर सागरी जलतरण स्पर्धा २८.४३ मिनिटात पूर्ण करून विशेष प्राविण्यसह नववा क्रमांक पटकावला. तर जयप्रकाश क्षिरसागर यांनी हेच अंतर ४३ मिनिटात पूर्ण करून सतरावा क्रमांक मिळवत उत्कृष्ट कामगिरी केली.

या यशाबद्दल पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी या दोन्हीही स्पर्धकांचा बक्षीस देऊन सत्कार केला. यावेळी अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, डॉ.खंडेराव धरणे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अश्विनी जगताप, राखीव पोलीस निरीक्षक विजय धोंडगे, क्रीडा प्रशिक्षक संतोष सोनसळे यांनी विजयी स्पर्धक अंमलदारांचे कौतुक करून पुढील स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या.